लोकमत बुधवार, दि. १७ ऑगस्ट २०१६

# अवयवदानाच्या प्रयत्नात कुटुंबीयांकडूनच विरोध

## ७८ टक्के तरुणांचे मत : तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाचे सर्वेक्षण

सुमेध वाघमारे ● नागपूर

**मूत्रपिंड** (किडनी), फफ्फुस, यकृत, स्वादुपिंड, हृदय, हृदयाच्या झडपा, आतडी, डोळे, कानाचे ड्रम, त्वचा हे मानवाच्या शरीरातील विविध अवयव दान करुन एक मृत व्यक्ती इतर दहा व्यक्तींना नवा जन्म देऊ शकतो. अवयव दानाला घेऊन जनजागृती होत असली तरी पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने उपराजधानीत अवयव दानाची चळवळ केवळ ०.३ टक्क्यांवरच थांबल्याचे चित्र आहे. यामागील एक कारण पुढे आले आहे.

लोकमत विशेष

तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाने नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणात अवयव दानाचा साधा अर्ज भरण्यासाठीही कुटुंबीयांकडून विरोध होत असल्याचे ७८ टक्के तरुणांनी सांगितले.

शनिवारी जागतिक अवयव दान दिन साजरा करण्यात आला. या दिनाच्या पार्श्वभूमीवर तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाच्या प्रीती कूजूर, अंजली येसूदास व एस अॅबीन या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. दीपक मसराम यांच्या मार्गदर्शनाखाली तरुणांना अवयव दानाविषयी किती माहिती आहे, या विषयी गट संशोधन प्रकल्प पूर्ण केला.

या सर्वेक्षणात हिस्लॉप कॉलेज, रामदेवबाबा इंजिनिअरिंग कॉलेज, एमएसएस कॉलेज, एसएफएस कॉलेज व अंजुमन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग या महाविद्यालयांतून ६० महाविद्यालयीन तरुणांचा समावेश करण्यात आला.

### ६४ टक्के तरुणांना अवयव दानाची माहिती

◆ सर्वेक्षणात ६४ टक्के तरुणांनी अवयव दानाची माहिती असल्याचे सांगितले. ही माहिती त्याना मुख्यत्वेकरुन मित्र व प्रसार माध्यमातून मिळाली. अवयव दान ही आजच्या काळाची निकडीची गरज असल्याचे ९३ टक्के तरुणांचे म्हणणे आहे. ५४ टक्के तरुणांना १३ ऑगस्ट हा जागतिक अवयव दान दिन असल्याची कल्पना आहे.

### स्वयंसेवी संस्थाविषयी अनभिज्ञता

अवयव दान या मुद्यावर कोणती प्रमुख स्वयंसेवी संस्था काम करते, या बाबत मात्र, तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात अनभिज्ञता आढळली. अवयव दानाविषयी शास्त्रोक्त माहिती मिळाल्यावरच अवयव दानकर्ता असलेला अर्ज भरण्याबद्दल विचार करु, असे ६२ टक्के तरुणांनी सांगितले.

### ६६ टक्के तरुणांना संपर्काचा पत्ताच माहीत नाही

अवयव दानासाठी कुणाशी संपर्क साधावा याची माहिती ६६ टक्के तरुणांना नाही. केवळ २७ टक्के तरुणांनी अवयव दान जनजागृती कार्यक्रमात कधीतरी भाग घेतल्याचे सांगितले, तर ४३ टक्के तरुणांनी वर्तमान अवयव दान मोहिमेबद्दल समाधान व्यक्त केले.

### ४६.६६ टक्के तरुणांना वाटते भीती

वेळ आल्यास अवयव दान करणार काय, या प्रश्नाच्या उत्तरात ४६.६६ टक्के तरुणांनी भीती वाटत असल्याचे प्रांजळपणे कबूल केले. ९४ टक्के विद्यार्थ्यांनी जनजागृती मोहिमेबद्दल समाधान व्यक्त केले तर ७८ टक्के तरुणांनी अवयव दान करण्याच्या प्रयत्नात उदा. साधा अर्ज भरण्यासही कुटुंबीयांकडून विरोध होत असल्याचे मान्य केले. ५८ टक्के तरुणांनी अवयव दानाला धार्मिक स्तरावर विरोध हळूहळू कमी होत असल्याचेही सांगितले.